जा.क्र./पोउआ/वाह/ 10957/२०१८

प्रेसनोट

पुणे, दिनांक - 19 /१०/२०१८

ज्याअर्थी पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी तेजस्वी सातपुते, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, यापुर्वी काही पार्किंग निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, साधु वासवानी रोड, पुणे - १ यांचे कार्यालयात दिनांक - २९ /१०/२०१८ ते दिनांक - ०४ /११/२०१८ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**वारजे वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

**१) हनुमान चौक रोड २) मारुती मंदिर समोरील रोड ३) वारजे गावठाण गल्ली क्र. १ व ४) वारजे गावठाण गल्ली क्र. २ या रस्त्यावर अवजड वाहनांना बंदी करण्यात येत आहे.**